पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभागाच्या ७ वा मजला, मंत्रालय (विस्तार) येथील दालन क्र.७०० चे नुतनीकरण

वित्तीय मान्यता देण्याबाबत

महाराष्ट्र शासन
पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग
शासन निर्णय क्र.संकीर्ण-२०१५/प्र.क्र.११६/आस्था

मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक
मंत्रालय (विस्तार), मुंबई- ४०० ०३२.
दिनांक : २८ फेब्रुवारी, २०१९

वाचा:- १. शासन निर्णय समक्रमांक दिनांक २९.२.२०१६, शुध्दीपत्रक समक्रमांक दिनांक ५.३.२०१६ व १९.३.२०१६.

२. शासन परिपत्रक वित्त विभाग क्र.अर्थसं-२०१६/प्र क्र ८९/अर्थ-३, दि.२०.४.२०१६.

३. कार्यकारी अभियंता, इलाखा शहर विभाग मुंबई यांचे पत्र क्र. इशवि/मंत्रालय/१८२७ दि.१.९.२०१६

४. विभागाचा समक्रमांक दिनांक १.१०.२०१६ चा शासन निर्णय.

प्रस्तावना :-

पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभागाच्या दालन क्र. ७००, ७ वा मजला, मंत्रालय (विस्तार) याचे नुतनीकरण, सदर दालनातील विद्युतसंच मांडणीचे नुतनीकरण आणि वातानुकूलित यंत्र बसविणे यासाठी कार्यकारी अभियंता, दक्षिण मुंबई विद्युत विभाग आणि कार्यकारी अभियंता, इलाखा शहर विभाग यांनी खालील प्रमाणे एकूण रुपये.२२,०७,९६८/- खर्चाची अंदाजपत्रके सादर केली होती.

अ.क्र.	कार्यालयाचे नाव	पत्राचा दिनांक	कामाचे स्वरुप व रक्कम रुपये
१.	कार्यकारी अभियंता, दक्षिण मुंबई विद्युत विभाग	दि.२४.७.२०१५	विद्युतसंच मांडणीचे नुतनीकरण/ रु.२,७५,५४४/-
			वातानुकूलित यंत्रे बसविणे/ रुपये.३,०९,२८८/-
२.	कार्यकारी अभियंता, इलाखा शहर विभाग	दि.१७.७.२०१५	दालनाचे नुतनीकरण/ रुपये.१६,२३,१३६/-
		एकूण	रुपये २२,०७,९६८/-

तथापि, सार्वजनिक बांधकाम विभागाने छाननीअंती पुढीलप्रमाणे एकूण रुपये २०,९८,९४४/- इतक्या किंमतीच्या अंदाजपत्रकास काही अटींच्या अधीन राहून मान्यता दिली आहे.

अ. क्र.	कामकाजाचे स्वरुप	प्रस्तावित अंदाजपत्रकाची रक्कम (रुपये)	कपात केलेली रक्कम (रुपये)	सा.बां.वि.ने मान्य केलेले अंदाजपत्रक (रुपये)
१	२	३	४	५
१	विद्युत संच मांडणी नुतनीकरण	२,७५,५४४/-	५०,२३५/-	२,२५,३०९/-

२	२ स्पिल्ट वातानुकूलित यंत्रे	३,०९,२८८/-	५६,३८८/-	२,५२,९००/-
३	कार्यालयीन दालनाचे नुतनीकरण	१६,२३,१३६/-	२,४०१/-	१६,२०,७३५/-
	एकूण रक्कम	२२,०७,९६८/-	१,०९,०२४/-	२०,९८,९४४/-

त्यानुसार संदर्भाधीन अ. क्र. १ येथील शासन निर्णयान्वये रुपये २०,९८,९४४/- (रुपये वीस लाख अठ्ठयाण्णव हजार नऊशे चव्वेचाळीस फक्त) इतक्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता देण्यात आली असून त्यापैकी सन २०१५-२०१६ करिता रु.८.०० (रुपये आठ लाख फक्त) इतक्या खर्चास शासन निर्णयात नमूद अटींच्या अधीन राहून वित्तीय मान्यता देण्यात आली आहे. सदर रक्कम कार्यकारी अभियंता, इलाखा शहर यांना पुस्तकी समायोजनाने अदा करण्यात आली आहे.

०२. त्यानंतर दि.१.१०.२०१६ च्या शासन निर्णयान्वये, कार्यकारी अभियंता, इलाखा शहर विभाग व कार्यकारी अभियंता, दक्षिण मुंबई विद्युत विभाग यांना सार्वजनिक बांधकाम विभागाने दिलेल्या मान्यतेनुसार अदा करावयाच्या अनुक्रमे रु.८,२०,७३५/- व रु.४,७८,२०९/- या शिल्लक रक्कमेपैकी कार्यकारी अभियंता, इलाखा शहर विभाग यांना रु.६,५६,५८८/-(रुपये सहा लाख छप्पन्न हजार पाचशे अठ्ठयाऐंशी फक्त) आणि कार्यकारी अभियंता, दक्षिण मुंबई विद्युत विभाग यांना रु.३,८२,५६७/-(रुपये तीन लाख ब्याऐंशी हजार पाचशे सदुसष्ट फक्त) अशी एकूण रु.१०,३९,१५५/-(रुपये दहा लाख एकोणचाळीस हजार एकशे पंचावन्न फक्त) एवढी रक्कम अदा करण्यास मान्यता देण्यात आली आहे. कार्यकारी अभियंता, इलाखा शहर विभाग, मुंबई यांना देय उर्वरित रु.१,६४,१४७/- व कार्यकारी अभियंता, दक्षिण मुंबई, विद्युत विभाग, मुंबई यांना देय उर्वरित रु.९५,६४२/- अदा करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

<u>शासन निर्णय</u>

पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभागाच्या दालन क्र. ७००, ७ वा मजला, मंत्रालय (विस्तार) याचे नुतनीकरण, नुतनीकरण आणि वातानुकूलित यंत्र बसविणे यासाठी प्रशासकीय मान्यता देण्यात आलेल्या रुपये २०,९८,९४४/- (रुपये वीस लाख अठ्ठयाण्णव हजार नऊशे चव्वेचाळीस फक्त) इतक्या अंदाजपत्रकाच्या रक्कमेपैकी कार्यकारी अभियंता, इलाखा शहर यांना अदा करावयाच्या एकूण रु.१६,२०,७३५/- पैकी मंजूर करावयाची शिल्लक रक्कम रु.१,६४,१४७/- (रुपये एक लाख चौसष्ट हजार एकशे सत्तेचाळीस फक्त) व कार्यकारी अभियंता, दक्षिण मुंबई विद्युत विभाग यांना अदा करावयाच्या एकूण रु.४,७८,२०९/- पैकी मंजूर करावयाची शिल्लक रक्कम रु.९५,६४२/- (पंच्च्याण्णव हजार सहाशे बेचाळीस फक्त) इतकी अदा करण्यास या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात येत आहे.

०२. सदरचा खर्च २२५१-सचिवालय- सामाजिक सेवा- ०९०, सचिवालय (०१)(०१) पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग १३ कार्यालयीन खर्च (२२५१०६३२) मागणी क्र.झेडडी-१ या लेखाशिर्षाखाली सन २०१८-२०१९ या वर्षाकरीता असलेल्या योजनेत्तर तरतुदीतून कार्यकारी अभियंता, इलाखा शहर, मुंबई यांचा कोषागार क्र. ७१०१ आणि आहरण व संवितरण अधिकारी सांकेतांक ९०३६९६ व कार्यकारी अभियंता, दक्षिण मुंबई विद्युत विभाग, मुंबई यांचा कोषागार

सांकेतांक क्र.७१०१ आणि आहरण व संवितरण अधिकारी सांकेतांक ००३४५६ वर पुस्तकी समायोजनाने भागविण्यात यावा.

०३. हा शासन निर्णय वित्त विभागाचा शासन निर्णय क्र. विअप्र-२०१३/ प्र.क्र.३०/ २०१३/विनियम, भाग-२ दि.१७.४.२०१५ वित्तीय अधिकार नियम पुस्तिका १९७८ मधील भाग-१, उप विभाग-२ मधील अनुक्रमांक-१६ नियम-६४ व भाग-१ उप विभाग-२ मधील अ.क्र.१८ व नियम क्र. ६८ नुसार तसेच सार्वजनिक बांधकाम विभागाच्या सहमतीने व वित्त विभागाच्या शासन परिपत्रक क्र. अर्थसं-२०१६/ प्र. क्र. ८९/अर्थ -३ दिनांक २०.४.२०१६ मधील सुचनानुसार निर्गमित करण्यात येत आहे.

०४. सदर शासन निर्णय महाराष्ट्राच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक सांकेताक २०१९०२२८११२२०२९५२३ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावांने,

Digitally signed by Anees Iqbal Ismail Shaikh
Date: 2019.03.01 13:15:46 +05'30'

(अनिस शेख)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. महालेखापाल, महाराष्ट्र-१ (लेखा परिक्षा/ लेखा व अनुज्ञेयता), मुंबई.
२. महालेखापाल-२, नागपूर (लेखा परिक्षा/ लेखा व अनुज्ञेयता), मुंबई.
३. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई. (रोखशाखेमार्फत)
४. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई.
५. प्रधान सचिव (सांस्कृतिक कार्य) यांचे स्वीय सहायक,पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग, मंत्रालय, मुंबई.
६. उप सचिव (रोखशाखा/अर्थसंकल्प/आस्थापना), पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग, मंत्रालय, मुंबई.
७. अवर सचिव (अर्थसंकल्प) पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग, मुंबई
८. सार्वजनिक बांधकाम विभाग, (कार्या इमा-३) मंत्रालय, मुंबई.
९. वित्त विभाग (कार्या-व्यय-१४) मंत्रालय, मुंबई
१०. कार्यकारी अभियंता, दक्षिण मुंबई विद्युत विभाग, सार्वजनिक बांधकाम विभाग, भवन इमारत, पहिला मजला, २५ मर्झबान रोड, मुंबई- १.
११. कार्यकारी अभियंता , इलाखा शहर विभाग (सां.बा) यांचे कार्यालय, बांधकाम भवन इमारत, दुसरा मजला, २५ मर्झबान रोड, मुंबई- ४०० ००१.
१२. निवड नस्ती, आस्थापना.